<u>महाराष्ट्र शासन</u>

क्रमांक :-ताबिके २००८/१९९/प्र.क्र.८०/१अे,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ सप्टेंबर, २०१७.

<u>विषय</u> :- तालुका बीजगुणन केंद्र, पाथरवाला (येथील ५१.३३ हेक्टर) व महाकाळ (येथील ७.५२ हेक्टर), तालुका अंबड, जिल्हा जालना येथील एकूण ५८.८५ हेक्टर जमिन महसूल व वन विभागाकडे <u>प्रत्यार्पित करण्याबाबत.</u>

<u>ज्ञापन</u>

मराठवाडा, विदर्भ व खानदेश या भागातील ऊस क्षेत्रासाठी वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे यांना संशोधन केंद्र स्थापन करावयाचे आहे. कारखान्यांना ऊस बेणे पुरविणे, हवामानाचा विचार करून ऊसाच्या नवीन जाती निर्माण करणे, ऊस जातीच्या चाचण्या घेणे, रोग व कीड व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, इत्यादीच्या प्रयोजनासाठी संशोधन केंद्र स्थापन करण्याकरीता वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे यांनी कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील तालुका बीजगुणन केंद्र, पाथरवाला (५१.३३ हेक्टर) व महाकाळ (७.५२ हेक्टर), तालुका अंबड, जिल्हा जालना येथील एकूण ५८.८५ हेक्टर जमिनीची मागणी केलेली आहे.

सदर तालुका बीजगुणन केंद्राची स्थापना सन १९५७ मध्ये झालेली असून, तालुका बीज गुणन केंद्र, पाथरवाला व महाकाळ येथील जमिन ही भुसंपादीत जमीन आहे. सदर जमिन कृषि विभागाच्या कब्जे हक्कात आहे.

सदर प्रकरणाची पार्श्वभुमी अशी आहे कि पूर्वी (१) औरंगाबाद जिल्ह्यातील मौजे पखोरा, तालुका गंगापूर येथील तालुका बीजगुणन केंद्राची १०४.७३ हेक्टर जमिन, (२) उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुका बीजगुणन केंद्र, तेर, (३) भंडारा जिल्ह्यातील (सध्या गोंदिया जिल्ह्यात समाविष्ट) तालुका बीजगुणन केंद्र, कारंजा (१३.५३ हेक्टर), (४) भंडारा जिल्ह्यातील तालुका बीजगुणन केंद्र, डोंगरगाव (३१.९२ हेक्टर) आणि (५) लातूर जिल्ह्यातील तालुका बीजगुणन केंद्र, औसा (१०.४८ हेक्टर), ही ५ तालुका बीजगुणन केंद्रे बंद करून सदर क्षेत्राच्या जमिनी डेक्कन शुगर इन्स्टीट्युट, मांजरी, पुणे (सध्याचे वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे) या संस्थेला कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक :- ताबिके १५८९/५३०९९/२९९/३अे, दिनांक २६/१२/१९८९ अन्वये १० वर्षांच्या करारावर देण्याकरीता मान्यता देण्यात आली होती. तथापि, तालुका बीजगुणन केंद्र, कारंजा (जिल्हा भंडारा), तालुका बीजगुणन केंद्र, डोंगरगाव व तालुका बिजगुणन केंद्र, औसा, (जिल्हा लातूर) येथील जमिनींची आवश्यकता नसल्याचे डेक्कन शुगर इन्स्टिट्युटने कळविल्याने दिनांक २५/०१/१९९१ च्या शासन निर्णयान्वये त्या मर्यादेत पुर्वीचे जमीन हस्तांतरणाचे आदेश रद्द करण्यात आले. तालुका बीज गुणन केंद्र, तेर, जि. उस्मानाबाद येथील जमिनीवर अतिक्रमण झालेले असून

त्या ठिकाणी बारमाही पाण्याची सोय नाही. तसेच, तालुका बीज गुणन केंद्र, पखोरा, जि. औरंगाबाद येथील जमिनींवरसुद्धा मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. त्यामुळे सदर दोन्ही ठिकाणच्या जमिनींचा ताबा महसूल विभागाकडे असून ७/१२ उताऱ्यावरती जमिनीची मालकी अजूनही कृषि विभागाच्या नावे आहे. सदर जमिनी वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आलेल्या नाहीत.

तालुका बीजगुणन केंद्र, पखोरा, जिल्हा औरंगाबाद येथील १०४ हेक्टर, ६६ आर जमिनीचे हस्तांतरण करण्याबाबतचे आदेश दिनांक २६/१२/१९८९ रोजीचे असून सदर जमिन केवळ १० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्याबाबतचे शासनाचे आदेश होते. सदर आदेशांची अंमलबजावणी न झाल्याने सदर जमिनीचा ताबा परत कृषि विभागाला देण्यात यावा अशाप्रकारची मागणी आयुक्त (कृषि) यांनी केलेली आहे. परंतु याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. तसेच, शासन निर्णय क्र. ताबिके २०११/प्र.क्र.४३/१अे, दिनांक ८ सप्टेंबर, २०११ अन्वये तालुका बीजगुणन केंद्राच्या जमिनी कृषक अथवा अकृषक कामासाठी न देणेबाबत धोरणात्मक निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे.

तालुका बीजगुणन केंद्र, पाथरवाला येथील ५१.३३ हेक्टर व महाकाळ येथील ७.५२ हेक्टर (तालुका -अंबड, जिल्हा - जालना) मिळून ५८.८५ हेक्टर जमिनीवर बिजोत्पादन कार्यक्रम, शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम, अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षण, पिक प्रात्यक्षिक, सेंद्रीय शेती इ. उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. राज्यात एकूण ३५७ तालुके असून तालुका बीजगुणन केंद्रांची संख्या केवळ १९२ इतकी आहे. तालुका बिज गुणन केंद्राच्या जमिनी या तालुक्यांचा विकास होताना शहरी भागात आल्याने विविध खाजगी, व्यापारी, सहकारी, शासकीय, निम शासकीय, संस्थांकडून तालुका बिजगुणन केंद्रांच्या जमिनींची मागणी वेगवेगळ्या प्रयोजनासाठी करण्यात येत आहे.

महसूल विभागाच्या दिनांक ८.९.२००८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार महसूल व वन विभागाच्या परवानगीशिवाय जमीन हस्तांतरणावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत, तसेच शासकीय विभागांना प्रदान केलेल्या शासकीय जमिनींसंदर्भात अशा जमिनींची शासकीय विभागांना आवश्यकता नसल्यास, त्या विभागाने अशा जमिनी, महसूल विभागाच्या सहमतीने महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाकडील भास्कर पिल्ले विरूद्ध केरळ सरकार या न्यायालयीन प्रकरणातील निर्देशानुसार एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उपयोगात असलेल्या जमिनीचा सदर प्रयोजनार्थ उपयोग होत नसल्यास एखाद्या अन्य सार्वजनिक प्रयोजनार्थ अशी जमिन वर्ग करण्याचे अधिकार शासनाकडे निहीत आहेत.

सदर प्रकरणी तालुका बीजगुणन केंद्र, पाथरवाला व महाकाळ,तालुका अंबड, जिल्हा जालना येथील जमीन वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे यांना देण्याच्या अनुषंगाने नस्ती महसूल व वन विभागास पाठविण्यात आली होती. महसूल व वन विभागाने या संदर्भात विधी व न्याय विभाग व वित्त विभाग यांचे अभिप्राय घ्यावेत व तद्नंतर सदरची जमीन महसूल व वन विभागास समर्पित करून रितसर प्रस्ताव महसूल व वन विभागास सादर करावा, असे अभिप्राय दिलेले आहेत, सदरची कार्यवाही पुर्ण झालेली नाही.

दरम्यान तालुका बीजगुणन केंद्र, पाथरवाला (५१.३३ हेक्टर) व महाकाळ (७.५२ हेक्टर), तालुका अंबड, जिल्हा जालना येथील एकूण ५८.८५ हेक्टर जमिन वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे ही महत्वाची संस्था असल्यामुळे त्यांना जागा देणे योग्य राहील या मताच्या आधारे विशेष बाब म्हणून या संस्थेस देण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. त्यानुषंगाने, सदर जमीन महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात येत आहे.

हे ज्ञापन, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे. त्याचा संगणक सांकेतांक २०१७०९२५१५१८१७९५०१ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh Narayan Chandiwade

Digitally signed by Umesh Narayan Chandiwade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0a3a08c7339c487fe2836238383bf91bbd037b93b4bdf6c8e95d1969e585fffe, cn=Umesh Narayan Chandiwade
Date: 2017.09.25 15:08:03 +05'30'

(उ.ना.चांदिवडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक(निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. संचालक(विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
७. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जालना.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जालना.
१०.महालेखापाल, महाराष्ट्र - १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर.

प्रत माहितीकरीता सादर,

१. मा.मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई.
४. सह सचिव (निवगुनि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. कृषि विभागातील सर्व सह सचिव /उप सचिव / अवर सचिव /कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
६. निवडनस्ती (कार्यासन १-अे) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.